महाराष्ट्र शासन

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

आदिवासी विकास भवन, आर. टी. ओ. ऑफीस समोर गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर ४४००१०

दूरध्वनी क्र. २५६०३१४ फॅक्स क्र. २५६५००८

E_mail : atcngpest@gmail.com

## जाहिरात

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आस्था-२०१६/प्र.क्र.३८७(भाग-१)/का-१५ दिनांक ०१ डिसेंबर २०१८ मधील तरतूदीनुसार विशेष भरती प्रक्रिया राबवून शासकीय वसतिगृहे व आदर्श आश्रमशाळांमधील गृहपाल (पुरुष / स्त्री) संवर्गाची १०० टक्के रिक्त पदे भरती करणेबाबत निर्देशीत आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागपूर, भंडारा, देवरी, चंद्रपूर, चिमूर, गडचिरोली, अहेरी व भामरागड या प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय वसतिगृहे वर्ग ३ संवर्गाची गृहपाल (पुरुष / स्त्री) यांची खालील रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदाचा तपशिल पुढीलप्रमाणे-

### सामाजिक व समांतर आरक्षणाची पद संख्या

| पदाचा आरक्षणाचा तपशिल | | गृहपाल (पुरुष) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण रिक्त पद संख्या | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | अंशकालीन कर्मचारी १०% | अंपग ३% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | अनुसूचित जाती १३% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनुसूचित जमाती ७% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती अ ३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जमाती ब २.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जमाती क ३.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती ड २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विमाप्र २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इमाव १९% | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| ९ | एसईबीसी १६% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १० | खुला ३२% | ६ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ४ |
| एकूण | | १२ | २ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ९ |

| पदाचा आरक्षणाचा तपशिल | | गृहपाल (स्त्री) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण रिक्त पद संख्या | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | प्रकल्पग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | अंशकालीन कर्मचारी १०% | अपंग ३% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | अनुसूचित जाती १३% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनुसूचित जमाती ७% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती अ ३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जमाती ब २.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जमाती क ३.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती ड २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विमाप्र २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इमाव १९% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | एसईबीसी १६% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १० | खुला ३२% | ७ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ५ |
| | एकूण | ९ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ७ |
| | एकूण एकंदर | २१ | ३ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | १६ |

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१ ए /१६-ब दिनांक ०५ डिसेंबर २०१८ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी खालील पदे निश्चित केली आहेत.

| खुल्या प्रवार्गातील रिक्त पदे | एसईबीसी करीता खुल्या प्रवगातील रिक्त पदाच्या १६ % नुसार येणारी पदे | एसईबीसी वगळून निव्वळ खुला प्रवर्गातील येणारी पदसंख्या |
|---|---|---|
| १५ | २ | १३ |

**टिपः- प्रशासकीय कारणास्तव, बिंदुनामावलीच्या तपासणीच्या अधिन जाहिरातीत नमूद पदसंख्येत सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षणात कमी अधिक बदल होऊ शकते.**

सदर पद भरतीकरिता जाहिरात https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १८.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येणार असून, दिनांक १८.१२.२०१८ ते ०८.०१.२०१९ या कालावधीत उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण, परिक्षा शुल्क इ. माहिती https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १८.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यांत येईल.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर या कार्यालयास वरील संकेतस्थळ व वर नमूद कालावधी व्यतिरिक्त इतर पध्दतीने आलेल्या, या जाहिरातीपुर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्ज, निवेदनाचा विचार करण्यांत येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गृहपाल (पुरुष / स्त्री) या पदाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | | वर्ग- ३ |
| **नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ?** | | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास नियुक्ती समाप्त करण्यात येईल. |
| (अ) कर्तव्य | | नियमानुसार. |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण /ठिकाणे | गृहपाल (पुरुष / स्त्री) | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभागातील नागपूर/भंडारा/देवरी/चंद्रपूर/चिमूर/ गडचिरोली/अहेरी/भामरागड या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत शासकीय वसतिगृहे |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | | **नियुक्ती आदेश** मिळाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत |
| परिविक्षाधिन कालावधी | | सर्व पदांवरील नियुक्ती २ वर्षे कालावधीसाठी परिविक्षाधीन म्हणून करण्यात येईल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच व नियुक्ती आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता झाल्यानंतरच परिविक्षाधीन कालावधी विलोपीत करण्यांत येईल. |
| पदोन्नतीच्या संधी | | **शासन नियमानुसार** |
| **आवश्यक शैक्षणिक अर्हता** | | खालीलप्रमाणे |
| १ | गृहपाल (पुरुष) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी |
| २ | गृहपाल (स्त्री) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी |
| समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या? | | नाही. |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | | वरील सर्व पदांसाठी जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास वय किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथील<br>१. अपंग- ४५ वर्षे<br>२. माजी सैनिक ४५ वर्षे<br>३. खेळाडू- विहित वयोमर्यादेत ५ वर्षे वयात शिथील<br>४. प्रकल्पग्रस्त- ४५ वर्षे<br>५. अंशकालीन / १९९१ ची जनगणना / १९९४ निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी - ४६ वर्षे |
| राष्ट्रीयत्व | | भारतीय |
| अधिवास | | महाराष्ट्र |

## उमेदवार निवडीची पध्दती

१. गृहपाल (पुरुष / स्त्री) या पदसंवर्गासाठी सामान्यज्ञान, आदिवासी संस्कृती, आदिवासी प्रति संवेदनशीलता, बालहक्क, मुलांचे संरक्षण, बुध्दिमत्ता चाचणी इ. विषयांच्या आधारे वस्तुनिष्ठ स्वरुपाची बहुपर्यायी पध्दतीची २००,गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

२. सदर परिक्षेकरिता उत्तीर्ण होण्याकरिता किमान ५५ टक्के गुण मिळणे बंधनकारक राहील. सदर बाबतीत अनुसूचित जाती-जमातीच्या उमेदवारांना उत्तीर्ण होणेसाठी ४५ टक्के गुण मिळणे बंधनकारक राहील.

३. लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणानुसार निवड याद्या तयार करुन निवड करण्यांत येईल.

### ---सर्वसाधारण सुचना---

### शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८९ए/२०१८/१६-ब दिनांक ०५.१२.२०१८ च्या

### शासन निर्णयातील सुधारणा

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदाचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन पडताळणीच्या अधिन राहून ऑनलाईनद्वारे अर्ज स्वीकृत करण्यात येतील. उमेदवारने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता / आरक्षण उमेदवार धारण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यांत येईल.

३. उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

४. रिक्त पदाच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची तसेच सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांनी राखून ठेवले आहे.

५. गृहपाल (पुरुष / स्त्री) ही पदे निवासी असल्याने विद्यार्थी / विद्यार्थीनीचे पालक या नात्याने देखभाल करणे, संरक्षण करणे, संगोपन करणे, त्यांची आरोग्य विषयक काळजी घेणे,, त्यांच्या भोजनाची व निवास व्यवस्थेबाबत काळजी घेणे, मार्गदर्शन करणे, समुपदेशन करणे, चांगले संस्कार करणे इ. बाबींसाठी व शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे बंधनकारक आहे.

६. गृहपाल (स्त्री/पुरुष) संवर्गात उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांना नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यातील कोणत्याही शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल.

७. गृहपाल हे निवासी पद असल्याने उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी २४ तास शासकीय वसतिगृहात राहणे बंधनकारक राहील.

८. जाहिरातीतील नमुद केलेल्या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दिनांक ३०.११.२०१८ रोजी गणले जाईल.

९. वयोमर्यादेच्या बाबत दिव्यांग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त व अंशकालीन उमेदवारासाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहिल.

१०. जाहिरात व पद भरती संबंधीच्या बाबत http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर सूचना उपलब्ध असून, दिनांक १८ डिसेंबर २०१८ ते दिनांक ०८ जानेवारी २०१९ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत पात्रताधारक उमेदवारांनी वर नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज करावेत.

११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर या कार्यालयास वरील संकेतस्थळ व वर नमूद कालावधी व्यतीरिक्त इतर पध्दतीने आलेल्या, या जाहिरातीपुर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

१२. उमेदवारांनी अर्ज करतांना केवळ ऑनलाईन पध्दतीने http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरुन त्याची प्रिंट स्वत:जवळ जतन करावी. उमेदवारीची निवड झाल्यास सदरची प्रिंट कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

१३. लेखी परिक्षेसाठी व कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.

१४. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार मागासवर्ग प्रवर्गात अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी सहा महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन तसे वैधता प्रमाणपत्र अपर आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल याची नोंद घ्यावी.

१५. गुणानुक्रमे सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीपुर्वी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन तसे वैधता प्रमाणपत्र अपर आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१६. जो पर्यंत उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाही तोपर्यंत त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

१७. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच महिला व खेळाडु या समांतर आरक्षणातील उमेदवारांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१७-१८ या कालावधीतील माहे मार्च २०१९ पर्यंत वैध असलेले व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्या पुर्वीच्या दिनांकाचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

१८. जर वरीलप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उमेदवार सादर करु शकला नाही तर उमेदवारांनी खोटी माहिती सादर केली या कारणास्तव त्याची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

१९. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१७-१८ या कालावधीतील माहे मार्च २०१९ पर्यंत वैध असलेले व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्या पुर्वीच्या दिनाकाचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

२०. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयामध्ये त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील गट क पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी तशी नोंद केलेल्या उमेदवारांनाच अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी अर्ज करता येतील.

२१. उमेदवार माजी सैनिक असल्यास सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना कायमचे वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जातो.)

२२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१.०१.१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र / २०२/०९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवारांचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२३. जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो त्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचा निर्णय अंतिम असेल.

२४. अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही .

२५. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र- आस्था-१००२/प्र.क्र.४५/का-१५ दिनांक १०.०८.२००५ अन्वये अपंग उमेदवारांच्या नियुक्ती संबंधात संबंधीत पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि सदर शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील निकष लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी नियुक्तीसाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबत.)

२६. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील.

२७. विवाहीत महिला उमेदवाराने अर्ज करतांना त्याच्या लग्नापुर्वीच्या नावानेच अर्ज करावा.

२८. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक ०१ जुलै २००५ व दिनांक २८ मार्च २००६ नुसार तिसरे अपत्य जन्माला आले असल्यास ती अनर्हता ठरवून सेवा समाप्त करण्यांत येईल.

२९. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्र.क्र.३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र३९/ क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील (सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३०. उमेदवार अपात्र ठरला अथवा गैरहजर राहिला तर ऑनलाईन पध्दतीने भरलेले परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

३१. गृहपाल (स्त्री/पुरुष) या पदाच्या पदभरती संबंधी काही न्यायालयीन प्रक्रिया झाल्यास सदर न्यायालयीन प्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय, नागपूर व मा. उच्च न्यायालय, नागपूर / मुंबई यांच्या कार्यकक्षेतच राहील याची नोंद घ्यावी.

## गृहपाल पदांसाठी परिक्षा शुल्क

खुल्या प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ८००/-

राखीव प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ७००/-

**सदरचे शुल्क हे केवळ ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारले जाईल.**

**राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ते खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांवर अर्ज करतांना त्यांना खुल्या प्रवर्गासाठी लागू असणारे परिक्षा शुल्क भरावे लागेल.**

## ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक (Link) उघडावी.

| | |
|---|---|
| १. | भरती प्रक्रियेसंबंधीच्या सर्व अटी-शर्ती असलेल्या माहिती पत्रिकेची प्रिंट काढावी. |
| २. | जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आपण जर सदर पदास पात्र ठरत असाल तर संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावा. |
| ३. | अर्जात नमूद केलेले सर्व रकाने भरल्यानंतर अर्जात फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या ठिकाणावर अपलोड करावी. |
| ४. | अर्जदाराने परिपुर्ण भरलेला अर्जाचे प्रिंट काढून आपल्यासोबत जतन करावी. गुणवत्ता यादीमध्ये उमेदवाराचे नांव असल्यास उमेदवाराला कागदपत्र पडताळणीच्या वेळी ऑनलाईन अर्जाची प्रिंट सादर |

| | |
|---|---|
| | करणे बंधनकारक आहे. अर्जाची प्रिंट कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर न केल्यास आपली कागदपत्र पडताळणी केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ५. | उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर त्यास अर्जाची सद्यस्थिती कळावी, कागदपत्र पडताळणी सुचनापत्र उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय.डी. तयार करुन, मोबाईल क्रमांक आणी ई-मेल आय.डी. अर्जात नमूद करणे बंधनकारक आहे. भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर सुरु ठेवणे आवश्यक आहे. सदर भरती बाबतची आवश्यक ती माहिती आपणांस ई-मेल आय.डी. वर पाठविण्यात येईल. |
| ६. | गृहपाल (पुरुष) या पदासाठी पुरुष उमेदवार व गृहपाल (स्त्री) या पदाकरिता स्त्री उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील |
| ७. | ऑनलाईन भरलेला अर्ज व प्रत्यक्षात सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्ज रद्द करण्यांत येईल. व यापुढील सर्व निवडी करिता अपात्र ठरविण्यात येईल. |

## समांतर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना

| | | |
|---|---|---|
| १. | खेळाडू उमेदवार | खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू<br>राज्य अजिंक्यपद स्पर्धा याचा सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यपेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळांडुचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.<br>अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६/ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्र.क्र.३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र३९/ क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण नसल्याने, राष्ट्रिय व राज्य स्तरावरील (सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| २. | अंशकालीन उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयामध्ये त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदव्युत्तर पदवी तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र असलेले असे अंशकालीन उमेदवार. |
| ३. | माजी सैनिक / माजी सैनिक पाल्य | सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना कायमचे वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर |

| | | |
|---|---|---|
| | | अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जाईल.) |
| ४. | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त उमेदवार | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१.०१.१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र / २०२/०९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवारांचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. |
| ५. | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१ / मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१७-१८ या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| ६ | अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १ % समांतर आरक्षण | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/ का-३ दिनांक ०२.०४.२०१८ मधील तरतूदीनुसार अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू राहील. |
| ७ | **दिव्यांग उमेदवार** | एक हात, एका पायाने किंवा एक डोळा दिव्यांग उमेदवार अर्ज करण्यास पात्र |

(हृषीकेश मोडक)
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर